# कै. श्रीधर गजानन प्रथम चॅरीटेबल ट्रस्ट, चौल

**"नीलाश्री सहजीवन" वृध्दाश्रम, चौल**

**ता. अलिबाग, जि.रायगड**

**(रजि. नं.ई-१०९० रायगड)**

**संचालीत**

**"नीलाश्री सहजीवन" वृध्दाश्रम**

नीलाश्री सहजीवन वृध्दाश्रमात प्रवेश देण्यात येणाऱ्या स्त्री-पुरुष वृध्दांना खालील नियम व अटी मान्य करणे आवश्यक आहे. हे नियम व अटी मान्य करणाऱ्या स्त्री-पुरुष वृध्दांना प्रवेश दिला जाईल.

## प्रवेशसाठी नियम व अटी

१) सर्वसाधारण ५५ ते ६० वर्षापुढील वयोमानाच्या स्त्री-पुरुष वृध्दांना प्रवेश दिला जाईल.

२) स्त्री-पुरुष वृध्द सुदृध्द-रोगमुक्त असावे, अल्प व्याधी किंवा व्याधीग्रस्त असल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांचा प्रवेशासाठी ना हरकत परवाना आवश्यक असेल. दाखल केलेल्या वृध्दास कोणताही सांसर्गिक आजार (TB, AIDS, Leprasy etc.) असल्यास प्रवेश नाकारला जाईल. तसेच दाखल झालेल्या वृध्दास कालांतराने सांसर्गिक आजार झाल्यास आश्रम सोडावा लागेल. वैद्यकीय प्रमाणपत्र वृध्दाश्रमात दाखल होण्यापूर्वी वृध्दाचे नेहमीचे फॅमीली डॉक्टरांनी द्यावयाचे आहे. त्यानंतर वृध्द दाखल झाल्यानंतर वृध्दाश्रमाचे डॉक्टरांनी त्याची पूर्ण तपासणी करणेची आहे व त्या तपासणीत सदर वृध्दाला अन्य काही आजार असल्यास त्याची त्वरीत कल्पना वृध्दाचे नातेवाईकांना देणेची आहे.

३) नीलाश्री सहजीवन वृध्दाश्रम वृध्दांना सांभाळायची आणि काळजी घेण्याची पराकाष्टा करेल. परंतु सर्वस्वी जबाबदारी ही स्वत: वृध्दांची आणि त्यांच्या स्वकीयांची असेल.

४) वृध्दांना स्वखुशीने प्रवेश दिला जाईल. स्वकीयांचे आणि नातेवाईकांचे दडपण किंवा सक्ती असता कामा नये.

५) वृध्दांस प्रवेश मिळाल्यानंतर क्षेमकुशल आणि चौकशीसाठी जवळच्या नातेवाईकांनी महिन्यातून एक दोनदा येणे बंधनकारक राहील.

६) वृध्दांना मोठा असाध्य रोग, आजार झाल्यास उपचारासाठी घरी किंवा रुग्णालयात नातेवाईकांनी लगेच न्यायला हवे तसे न केल्यास वृध्दांना नेण्याचा सारा खर्च कर्मचाऱ्यांच्या खर्चासह करावा लागेल.

७) आठवडयातून एक दिवस नक्की केलेल्या दिवशी वैद्यकिय अधिकाऱ्यांकडून आवश्यक तपासणी केली जाईल. परंतु उपचाराचा खर्च वृध्दांना करावा लागेल.

८) वृध्दांना पथ्यपाणी आणि जादा आहाराचा खर्च वृध्दाश्रमांना द्यावा लागेल.

९) नातेवाईकांनी आणि बाहेरुन आणलेल्या खाद्यपेय पदार्थांना अपाय झाल्यास त्याची जबाबदारी वृध्दांची स्वत:ची असेल.

१०) कुठल्याही अमली पदार्थ विशेषत: मद्यपान सेवनास सक्त मनाई असेल.

११) तंबाखू, तपकीर-मिश्री, विडी, सिगारेट यांस इतर वृध्दांनी आक्षेप घेतल्यास त्या वृध्दांस हे प्रकार थांबवावे लागतील.

१२) ठरलेल्या वेळेतच फक्त चहा-नास्ता, भोजन दिले जाईल.

१३) काही तक्रारी असल्यास वृध्दांनी कर्मचा-यांशी वाद घालू नये. तक्रारी लेखी संचालकाच्या निर्दशनास आणाव्यात.

१४) एखाद्या वृध्दाची वागणुक संस्थेस, कर्मचाऱ्यांना आणि इतर वृध्दांना असहय, क्लेशकारक, हानीकारक आढळल्यास आणि समजुतीचा उपयोग न झाल्यास त्या वुध्दांस संस्था लगेच सोडावी लागेल. या परिस्थितीत पैशाच्या परतफेडीची जबाबदारी संस्थेची नसेल.

१५) वृध्दांस अपघातामुळे, नैसर्गिकरित्या अपाय झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी वृध्दाची असेल.

१६) वृध्दांश्रमाचे नियम सर्वाना बंधनकारक असतील श्रीमंत गरीब हा भेद चालणार नाही.

१७) प्रायोगिक तत्वावर सुरुवातीस वृध्दास एक महिन्यासाठी प्रवेश दिला जाईल आणि पुढील वास्तव्य वुध्दाच्या वर्तणुकीनुसार केंद्राधिकारी ठरवतील.

१८) वृध्दास अपघातामुळे किंवा वैयक्तिक चुकीमुळे काही हानी पोहचल्यास किंवा नैसर्गिक/अनैसर्गिक मृत्यु झाल्यास वृध्दाश्रम जबाबदार राहणार नाही.

१९) कोणत्याही कारणास्तव संस्थेबाहेर जायचे झाल्यास संस्थेची लेखी परवानगी आवश्यक असेल.

२०) आपल्या मौल्यवान वस्तू स्वत:च्या जबाबदारीवर वापराव्या.

२१) वृध्दांनी आपल्या जवळ कमीत कमी पैसे ठेवावे. जास्त पैसे की जे इतर कारणासाठी व औषधपाण्यासाठी लागतात ते वृध्दाश्रमात जमा करुन पावती घ्यावी.

२२) सुरुवातीला हिंडू, फिरु शकणाऱ्या वृध्दाकरीता कालांतराने वृध्दत्वाने अथवा अन्य कारणाने वृध्दाश्रमाच्या सेवकांच्या सेवेत वाढ झाल्यास समिती ठरवील त्याप्रमाणे (रू. ५०००/- ते रू. १००००/-) जादा आकार द्यावा लागेल.

टीप :- वृध्दाश्रमाचे सर्व नियम आम्ही काळजीपूर्वक वाचले असून ते पाळण्याची जबाबदारी वृध्द व वृध्दाचा आप्त नातेवाईक या नात्याने आम्ही स्वीकारत आहोत.

वृध्दांच्या नातेवाईकांची सही (साक्षी)

प्रवेश घेणाऱ्या स्त्री-पुरुष वृध्दाशी नाते ________

संपूर्ण पत्ता ________________

________________

आपला/आपली

प्रवेश घेणाऱ्या स्त्री-पुरुष वृध्दांचे संपूर्ण नाव ________________

प्रवेश घेणाऱ्या स्त्री-पुरुष वृध्दांची सही ________________